॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची फिरती विज्ञान प्रयोगशाळा दि. २७ व २८ सप्टेंबर रोजी अमळनेर तालुक्यातील विविध शाळांमध्ये पोहोचली. दोन दिवसांच्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी आणि मा. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात असून आदिवासी ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान विषयांमध्ये प्रायोगिक अनुभव मिळतो, त्यांची शैक्षणिक आवड वाढते आणि विज्ञानातील नवनवीन संकल्पना प्रत्यक्ष पाहून समजून घेण्याची क्षमता विकसित होते

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे समन्वयक डॉ. एस. एस. घोष यांनी प्रताप महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. एल. ए. पाटील यांच्याशी संपर्क साधून या भेटीचे आयोजन केले. दोन्ही दिवसांत मिळून १५०० विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोगशाळेला भेट दिली. या उपक्रमांसाठी डॉ. भावेश पाटील, राहुल हजारी, मयुरी गिरासे, अक्षय सैंदाणे आणि रोहित भोई यांनी योगदान दिले. तसेच, बसमधील सुमारे ३० पेक्षा जास्त प्रयोगांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि त्यांच्या शंकाचे निरसन केले.

२७ सप्टेंबर २०२५ रोजी, फिरती विज्ञान प्रयोगशाळेने लोकमान्य विद्यालय, अमळनेर येथील २१२ विद्यार्थ्यांना आणि साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालय, अमळनेर येथील ८४० विद्यार्थ्यांनी भेट देऊन विज्ञान विषयांचा प्रात्यक्षिक अनुभव दिला. या दिवशी एकूण १०५२ विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेत प्रत्यक्ष भेट देऊन विज्ञानाशी संबंधित प्रयोग आणि उपकरणांचा अनुभव घेतला. यावेळी प्रताप महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस.ए. पाटील, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ भूविज्ञान विभागाचे प्रा डॉ. भास्कर पाटील, यांच्यासह लोकमान्य शिक्षण मंडळाचे चिटणीस विवेक भाडेकर, प्रा. डॉ प्रभाकर जोशी, कार्याध्यक्ष राजाभाऊ खाडिलकर, मुख्याध्यापक जे. जी. चौधरी, मनीष खांडोळकर, मनोहर महाजन, भुषण महाजन सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.

२८ सप्टेंबर २०२५ रोजी यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक आदिवासी आश्रम शाळा, पिंपळे बुद्रुक येथील ३१५ विद्यार्थी आणि कै. प्रज्ञावंत आबा सो. मेसेज पाटील अनुदानित प्राथमिक व कै. अण्णा हिराजी पाटील अनुदानित माध्यमिक आदिवासी आश्रम शाळा, तोडपुरा येथील १३३ विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. दोन्ही दिवसांत मिळून एकूण १५०० विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित प्रयोग, उपकरणे आणि माहितीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या अनुभवामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी, प्रयोगात्मक कौशल्य आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढण्यास मदत होईल अशी प्रतिक्रिया शाळेच्या शिक्षकांनी दिली.

### बातमी नं. २

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील एम.ए. हिंदी विषयाचा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी महेश वसावे याने राष्ट्रीय स्तरावरील प्रो कबड्डी लीग स्पर्धेत बंगाल पॅरा वॉरियर्स संघात खेळत सहभाग नोंदवला आहे.

यंदा पहिल्यांदाच अपंग खेळाडूंसाठी सामने आयोजित करण्यात आले. २४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या सामन्यात बंगाल पॅरा वॉरियर्सने हरियाणाच्या पॅरा धाक्कड संघावर रोमांचक विजय मिळवला. हा सामना चुरशीचा ठरला असून बंगाल पॅरा वॉरियर्सने सात गुणांच्या फरकाने विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयी संघाकडून खेळताना महेश वसावे याने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

महेश वसावे यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म.सु. पगारे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा. डॉ. पगारे यांनी विजयी संघाचे मन:पूर्वक अभिनंदन करत महेशच्या खेळाडू वृत्तीचे व चिकाटीचे कौतुक केले.

या सत्कार कार्यक्रमाला हिंदी विभागातील डॉ. प्रिती सोनी, मराठी विभागातील प्रा. भारती सोनवणे, प्रशाळेतील कर्मचारी श्री. भरत पालोदकर, श्री. चंद्रकांत बि-हाडे, संशोधक विद्यार्थी महेश सुर्यवंशी तसेच इतर प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३० सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ३० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील वरिष्ठ सहायक संजय गुलाबसिंग पाटील हे आज विद्यापीठ सेवेतून निवृत्त झाले.

विद्यापीठाच्या विधी व माहितीचा अधिकार येथील वरिष्ठ सहायक संजय गुलाबसिंग पाटील हे नियत वयोमानानूसार विद्यापीठाच्या सेवेतून सेवा निवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला. सत्कारार्थी यावेळी सहकुटूंब उपस्थित होते. यावेळी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागासवर्गीय कर्मचारी संघटना व उमवि पतपेढीच्या वतीने सेवानिवृत्त होत असलेल्या कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३० सप्टेंबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता